R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : २४

दि. ०२ जानेवारी २०२६, वार :शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## अमित देशमुखांचा मास्टरस्ट्रोक: ७० पैकी वंचितला फक्त ५ जागा, महापालिकेची सूत्रे देशमुखांच्या हातात

लातूर /प्रतिनिधी :-लातूर शहर महानगरपालिकेच्या राजकारणात माजी पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांनी आक्रमक राजकीय खेळी करत वंचित बहुजन आघाडीशी युती केली असली, तरी जागावाटपात आपले पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केले आहे. ७० जागांच्या महापालिकेत वंचित बहुजन आघाडी ला अवघ्या ५ जागांवरच समाधान मानावे लागल्याने ही युती चर्चेचा विषय ठरली आहे.

या जागावाटपातून देशमुख यांनी स्पष्ट संदेश दिला असून, युती ही गरज म्हणून, तर सत्ता ही स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवण्याची रणनीती त्यांनी यशस्वीपणे राबवली आहे.



दलित-वंचित मतांचे विभाजन टाळत भाजप व अजित पवार गटाला आव्हान देणे, हा या खेळीमागचा प्रमुख उद्देश असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, या घडामोडींमुळे भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तसेच काँग्रेस सोडून गेलेल्या नेत्यांच्या गटांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. लातूर महापालिकेच्या निवडणुकीत आता थेट लढतीचे चित्र स्पष्ट होत असून, राजकीय वातावरण अधिक तापण्याची चिन्हे आहेत.

हवे असल्यास मी याला अत्यंत धारदार (टॅब्लॉइड) हेडलाईन, सोशल मीडिया ब्रेकिंग लाईन, किंवा एक ओळीत व्हायरल हेडलाईन या स्वरूपातही तयार करून देऊ शकतो.

## ऐतिहासिक विजयस्तंभास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिवादन

पुणे (जिमाका वृत्तसेवा) : २०८ व्या शौर्यदिनानिमित्त उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज सकाळी पेरणेफाटा येथील ऐतिहासिक विजयस्तंभास अभिवादन केले.



यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे महासंचालक सुनील वारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, दरवर्षीप्रमाणे राज्य शासनाच्यावतीने विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी उपस्थित असून, हे अभिवादन राज्यातील नागरिकांच्यावतीने करण्यात येत आहे. विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या आयोजनासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा प्रशासनाने केलेल्या उत्तम नियोजनाबद्दल उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी समाधान व्यक्त केले. अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायांची मोठी गर्दी लक्षात घेऊन राज्य शासनामार्फत योग्य ती काळजी घेण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## मतदान हे 'राष्ट्रीय कर्तव्य'; लोकशाही बळकट करण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा - मनपा आयुक्त श्रीमती मानसी





लातूर/प्रतिनिधी: मतदानाचा दिवस हा केवळ सुट्टी म्हणून मौजमजा करण्याचा दिवस नसून, तो एक राष्ट्रीय उत्सव म्हणून आपले कर्तव्य पार पाडण्याचा दिवस आहे. लोकशाहीची पाळेमुळे अधिक घट्ट करण्यासाठी तरुण वर्गामध्ये मतदान करण्याची 'क्रेझ' निर्माण झाली पाहिजे, असे परखड प्रतिपादन लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रीमती मानसी यांनी केले.

लातूर शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ च्या पार्श्र्वभूमीवर, दयानंद कला महाविद्यालय येथे 'स्वीप' (डतएएझ) अंतर्गत आयोजित मतदान जनजागृती अभियानात त्या मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना श्रीमती मानसी यांनी मतदारांमधील उदासीनता दूर करण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या की, केवळ सुट्टीचा आनंद घेण्यापेक्षा लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः मतदान करण्यासोबतच आपल्या घरातील आणि परिसरातील सर्व पात्र मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करून एक सजग नागरिक म्हणून आपली भूमिका बजावावी.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सांगितले की, तरुणांनी मतदान प्रक्रियेत केवळ मतदार म्हणून नव्हे, तर सक्रिय घटक म्हणून सहभागी होऊन राष्ट्रीय विकासामध्ये आपला मोलाचा हातभार लावणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे मतदान जनजागृती करण्यासाठी उभारलेला सेल्फी पॉईंट व कलेच्या माध्यमातून झालेली जनजागृती. राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त डॉ. संदिपान जगदाळे व महाविद्यालयातील संगीत व नाट्य विभागातील प्राध्यापकांच्या चमूने पोवाड्याचे सादरीकरण केले, तर मनपा शाळा क्रमांक सहाच्या विद्यार्थ्यांनी बहारदार भारूडा सादर करून मतदानाचे महत्त्व पटवून दिले. या सांस्कृतिक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

या अभियानास मनपा अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मनपा शिक्षणाधिकारी श्र्वेता नागणे, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित आणि प्रा. डॉ. शिवकुमार राऊतराव, सतीश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. दशरथ ननवरे यांनी केले, तर आभार श्री. मधुकर ढमाले यांनी मानले.

## भीमा कोरेगाव येथे मानवंदनेसाठी आंबेडकर अनुयायांची, महिलांचीही लक्षणीय उपस्थिती






पुणे /प्रतिनिधी :-महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आंबेडकर अनुयायी भीमा कोरेगाव येथे मानवंदना देण्यासाठी मोठ्या संख्येने दाखल झाले. विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी पहाटेपासूनच गर्दी जमली होती. यामध्ये महिलांची लक्षणीय व शिस्तबद्ध उपस्थिती विशेष ठरली.

मानवंदनेदरम्यान महिलांनी कुटुंबासह सहभाग नोंदवत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन केले. समता, न्याय आणि बंधुतेचा संदेश देणाऱ्या घोषणा व शांततेत पार पडलेला कार्यक्रम लक्षवेधी ठरला.

कायदा व सुव्यवस्थेसाठी प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार न घडता मानवंदना शांततेत पार पडल्याची माहिती प्रशासनाने दिली. दरवर्षीप्रमाणे यंदाही भीमा कोरेगाव येथील हा सोहळा सामाजिक ऐक्याचे प्रतीक ठरला.

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते पिंपरखेड शाळेत वृक्षारोपण

नाशिक, (जिमाका वृत्तसेवा) : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल विभागाच्या 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज पिंपरखेड (ता. दिंडोरी) येथील कै. लक्ष्मण बाबाजी धात्रक माध्यमिक विद्यालय येथे वृक्षारोपण केले.



यावेळी अन्न औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, सामाजिक न्याय मंत्री प्रा. डॉ. अशोक उर्ईके, आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक जी. मल्लिकार्जुन, आदिवासी विकास आयुक्त लीना बन्सोड, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, आदिवासी विकास प्रकल्प नाशिकच्या प्रकल्प अधिकारी अर्पिता ठुबे, कळवणच्या काश्मिरा संख्ये, उपवनसंरक्षक (पश्र्िचम) सिद्धेश सावर्डेकर, उपवनसंरक्षक (पूर्व) राकेश सेपट आदी उपस्थित होते.

त्यानंतर, राज्यपाल श्री. देवव्रत यांनी शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, पिंपरखेड येथे भेट दिली. यावेळी आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके यांनी सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन तर अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शबरी उत्पादने त्यांचे स्वागत केले.

यावेळी विद्यार्थ्यांच्यावतीने लाठीकाठी प्रात्यक्षिके करत आणि सलामी देऊन राज्यपाल महोदयांना मानवंदना दिली. त्यानंतर विद्यार्थिनींनी लेझीम प्रात्यक्षिकाराद्वारे उपस्थितांची मने जिंकली. या मुलांचे राज्यपाल महोदयांनी कौतुक केले. हा परिसर अतिशय सुंदर असल्याची भावनाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## संपादकीय...

# लातूर शहर महानगरपालिका

अनेक वर्षांच्या प्रशासक राजानंतर लोकशाहीची कसोटी लातूर शहर महानगरपालिकेची शेवटची सार्वत्रिक निवडणूक २०१७ मध्ये झाली. नियमानुसार पाच वर्षांचा कार्यकाळ २०२२ मध्ये संपला. मात्र त्यानंतर तब्बल सुमारे तीन वर्षे लातूर महापालिका प्रशासकांच्या ताब्यात राहिली. आता पुन्हा निवडणुकांची घोषणा होत असताना, हा केवळ निवडणुकीचा प्रसंग नसून लातूरच्या लोकशाही प्रवासातील निर्णायक वळण ठरत आहे.

प्रशासक राज: तात्पुरता उपाय की दीर्घकालीन अपवाद?

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासक नेमणे ही कायदेशीर तरतूद असली, तरी ती तात्पुरती असावी असा घटनात्मक हेतू आहे. मात्र लातूर शहरात हा तात्पुरता उपायच दीर्घकाळ चालू राहिला. या काळात शहरातील नागरिकांना थेट निवडून दिलेले नगरसेवक, सभागृहातील चर्चा आणि लोकप्रतिनिधींचा दबाव–हे सर्वच हरवले.

लोकप्रतिनिधी नसल्याचे परिणाम प्रशासकांच्या काळात निर्णय झाले, कामेही झाली; पण प्रश्न राहिला उत्तरदायित्वाचा.

नागरिकांच्या तक्रारी मांडण्यासाठी राजकीय व्यासपीठ नव्हते विकासकामांवर लोकनियंत्रण कमी झाले शहराच्या दीर्घकालीन दृष्टीकोनावर लोकशाही छाप उमटली नाही

लोकप्रतिनिधी केवळ निर्णय घेत नाहीत; ते प्रश्न विचारतात, विरोध करतात आणि सुधारणा घडवतात–ही प्रक्रिया लातूरमध्ये दीर्घकाळ ठप्प राहिली.

निवडणुका आता का महत्त्वाच्या आहेत? अनेक वर्षांनंतर होत असलेल्या लातूर महापालिकेच्या निवडणुका म्हणजे:

नागरिकांना पुन्हा निर्णयाचा अधिकार शहरासाठी नवे नेतृत्व घडवण्याची संधी प्रशासनावर लोकशाही अंकुश पुन्हा प्रस्थापित करण्याचा क्षण

या निवडणुका केवळ सत्ता बदलासाठी नसून शहराच्या भविष्यासाठी दिशा ठरवणाऱ्या आहेत–पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेणारे नेतृत्व निवडण्याची ही वेळ आहे.

मतदारांची भूमिका: हक्कासोबत जबाबदारी प्रशासक राजानंतरची ही पहिलीच संधी असल्याने मतदारांनी विचारपूर्वक मतदान करणे आवश्यक आहे.

कोण प्रशासक काळातील त्रुटींना आवाज देऊ शकते? कोण शहराच्या दीर्घकालीन विकासाचा आराखडा मांडते?

कोण उत्तरदायित्व स्वीकारेल? मतदान म्हणजे केवळ हक्क नव्हे; ते लोकशाही पुनर्स्थापनेचे साधन आहे.

संपादकीय निष्कर्ष लातूर शहर महानगरपालिकेत अनेक वर्षे चाललेला प्रशासक कारभार हा लोकशाहीसाठी अपवादात्मक आणि चिंताजनक ठरला. आता होत असलेल्या निवडणुका म्हणजे उशिरा का होईना, पण लोकशाहीकडे परतण्याची संधी आहे.

प्रशासक राज हा नियम बनू नये, तर तो केवळ अपवादच राहावा–हीच या निवडणुकांची खरी कसोटी आहे.

कारण स्थानिक स्वराज्याशिवाय लोकशाही अपूर्ण आहे, आणि लातूरच्या विकासाचा खरा मार्गही तेथूनच जातो.

# प्रा. मंजुषा शिंदे-भांडवलकर यांना पीएच. डी.



लातूर : येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्रा. मंजुषा शिंदे-भांडवलकर यांना छत्रपती संभाजीनगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच. डी. पदवी प्रदान केली.

प्रा. शिंदे-भांडवलकर यांनी बार्शी (जि. सोलापूर) येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली 'आमोस टुटुओला यांच्या निवडक साहित्यकृतींमधील लोकसाहित्याचा अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध तयार करून विद्यापीठाला सादर केला. त्यांच्या संशोधनात आफ्रिकन साहित्यातील लोकसाहित्य, लोककथा, मिथक व सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करण्यात आला. प्रा. शिंदे-भांडवलकर यांना पीएच. डी. मिळाल्यानिमित्त प्रा. डॉ. अनिल कट्टे, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. रमेश चौगुले, डॉ. पांडुरंग शितोळे, डॉ. समाधान पवार यांनी अभिनंदन केले.

# राज्यात मनपा निवडणुकीत सर्वच पक्षांकडून घराणेशाहीला उत!

राज्यात होऊन घातलेल्या मनपा निवडणुकीमध्ये घराणेशाहीला मोठ्या प्रमाणात ऊत आला आहे.यामुळे पैशाचाही वापर मोठ्या प्रमाणात होण्याची दाट शक्यता आहे.सोबतच अनेक गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना किंवा त्यांच्या हीतचिंतकांनाही अनेक पक्षांनी उमेदवारी दिल्याचे सांगितले जाते.यामुळे सर्वसामान्यांची गोची होवून पिछेहाट झाल्याचे दिसून येते.यावरून स्पष्ट होते की, एकीकडे प्रत्येक पक्ष घराणेशाहीचा मोठा विरोध करतो आणि दुसरीकडे प्रत्येक पक्षातील राजकीय पुढारी आपल्याच घरामध्ये राजकारण असावेत या उद्देशाने खेळी खेळतात व कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रू आणतात व मन दुःखावतात.यामुळे सर्वसामान्यांची गोची होते व प्रत्येक पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या तोंडुन एकच सुर निघतो की, आम्ही फक्त सतरंज्याच उचलायच्या का?ही सत्य परिस्थिती राज्यात दिसून येते आणि सध्याच्या मनपा निवडणुकीमध्ये घराणेशाहीचे चित्र संपुर्ण महाराष्ट्रात उघडपणे स्पष्ट झाले आहे व धनशक्तीचा सुध्दा मोठ्या प्रमाणात वापर होण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, राजकीय पुढाऱ्यांच्या नातेवाईकांनाच लोकप्रतिनिधीत्व किंवा नगरसेवक करावे काय? इतरांनी फक्त हमालीच करावी व सतरंज्याच उचलायच्या का असे अनेक प्रश्न सर्वच पक्षाचे कार्यकर्ते आपापल्या राजकीय पुढाऱ्यांना विचारत आहेत. राजकीय पुढारी आपापल्या नातेवाईकांना निवडून आणण्यासाठी अतोनात पैशांचा वापर सुध्दा करणार यात दुमत नाही.राजकीय पुढारी जेव्हा कार्यकर्त्यांचे मन दुःखावते तेव्हा कार्यकर्ता खचून जातो यामुळे त्याचा आक्रोश अनावर होतो अशा परिस्थितीत हाणामारी किंवा तोडफोडीच्या घटना दिसून येतात. उपोषण,एबी फॉर्म पळवापळवी, रॉकेल अंगावर घेणे हा सर्व प्रकार राजकीय पुढाऱ्यांच्या घराणेशाहीमुळे व चुकीच्या निर्णयामुळे निर्माण झालेली मोठी आणि जटील समस्या आहे.राज्यात तर काही ठिकाणी एकाच घरी तिन ते सहा लोकांना उमेदवारी दिल्याचे सांगितले जाते.यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी हाडामासाच्या कार्यकर्त्यांचा बळी घेतात हे कितपत योग्य म्हणावे!आज अनेक राजकीय पक्षांच्या आघाड्या तुटल्यात परंतु उद्याचा विचार केला तर हे सर्वच पक्ष एकत्र बसणार आणि यात नुकसान होणार प्रत्येक पक्षांच्या कार्यकर्त्यांचे.राजकीय पक्षातील प्रत्येक राजकीय पुढारी कार्यकर्त्यांना सांगतात की तुझी उमेदवारी पक्की तु चिंता करू नकोस,परंतु तसे होतच नाही व राजकीय पुढारी कार्यकर्त्यांची दिशाभूल करतात व खोटे बोलतात आणि आपल्या जवळच्या व्यक्तीला किंवा नातेवाईकांना उमेदवारी देतात. यावरून स्पष्ट होते की खोटे बोलने राजकीय पुढाऱ्यांचे प्रथम कर्तव्य आहे असे मला वाटते.सध्याची मनपा निवडणुक कार्यकर्त्यांची नसुन राजकीय पुढाऱ्यांच्या घराणेशाहीची व धनशाहीची आहे. राजकीय पुढारी घराणेशाहीला प्रोत्साहन देवून लोकशाहीला तिलांजली देण्याचे घोर पाप करीत आहे.आजच्या परिस्थितीत राजकीय पुढारी स्वतःला त्या-त्या पक्षाचे बाहुली समजतात व कार्यकर्त्यांच्या प्रती वाटेल तो चुकीचा निर्णय घेवून कार्यकर्त्यांचा घात करतात ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक व गंभीर म्हणावी लागेल. जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# जोतिबा-सावित्री, काळाला ओलांडून गेलेले दांपत्य

म. जोतीराव फुले यांच्या पत्नी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या पतीच्या खांद्यास खांदा लावून केलेले क्रांतिकार्य बारकाईने विचारात घेतल्यास एक चमत्कार वाटण्यासारखे आहे. एकोणिसाव्या शतकात, पुण्यासारख्या सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात प्रचंड विरोधाला न जुमानता, सावित्रीबाईंसारख्या एका स्त्रीने भल्याभल्या जाणकारांना आणि मान्यवरांना दिपवून टाकण्यासारखे काम करावे, हे एक नवलच वाटणे स्वाभाविक होते. नाईलाजाने का असेना; जोतीराव फुले यांच्या क्रांतिकार्यापुढे काही तथाकथित साहित्यिकांना मान तुकविण्याशिवाय इलाज नव्हता. तथापी सावित्रीबाईंचे कार्य अद्याप काही जणांना खरे वाटत नाही. त्यांनी केलेल्या क्रांतिकार्याचे श्रेय त्यांना देणे त्यांच्या जीवावर येते. नायगांवसारख्या एका खेड्यात जन्मलेली, शेतकऱ्याची एक निरक्षर मुलगी, लग्नानंतर शिक्षण घेते; शिक्षिका बनते; मराठी, इंग्रजी व संस्कृत भाषा अवगत करते, व्यासंग वाढवून लोकशिक्षणासाठी गद्यपद्य रचना करते, समाजसेविका बनते, आणि फुल्यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाचे समर्थ नेतृत्व करते; हे ऐतिहासिक सत्य असूनसुध्दा कोत्या मनोवृत्तीच्या महाभागांना हे सर्व खोटे वाटते. एका पतिपरायण स्त्रीपेक्षा सावित्रीबाई मोठ्या असू शकत नाहीत, अशी काही जणांची कोल्हेकुई ऐकावयास मिळते. एकोणिसाव्या शतकात या देशात स्त्रियांना जनावरांइतकीही किंमत नव्हती, देवाधर्माच्या नावाखाली भयाण-भीषण गुलामगिरीत भरडल्या जाणाऱ्या कालखंडात एक ज्योत आपले पती जोतीराव फुले याच्या दैदिप्यमान ज्योतीने प्रज्वलित होते; आणि जगातील सर्व स्त्री समाजाला आपल्या प्रज्वलित झालेल्या ज्योतीने प्रकाश दाखवते; असे हे अपवादात्मक आणि अलौकिक उदाहरण आहे. जोतीराव फुले यांनाही एक घोर समाजक्रांतिकारक म्हणून त्यांच्या हयातीतच नव्हे तर, त्यांच्या मृत्यूनंतरसुध्दा पूर्ण न्याय मिळू शकत नाही, अशी अवस्था आहे. ही जर जोतीरावांची अवस्था, तर सावित्रीबाईंना न्याय मिळणे किती कठीण आहे याची कल्पना येऊ शकेल. दोन्ही दांपत्य काळाच्या ओघात कितीतरी पुढे होते...

शंभर-दीडशे वर्षांपूर्वीच्या काळात, त्या काळाच्या पुढच्या शंभर-दीडशे वर्षांनंतरचा विचार करणाऱ्या सावित्रीबाईच्या आठवणीनी मन भरून येतं. जे समाजात आजही घडत नाही, जे बोलताना आजही जिवाचा धडा करून बोलावं लागतं, ते सारं सावित्रीबाई बोलून, करूनही गेल्या! स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे कुटुंबसंस्था नष्ट होते आहे, कोसळते आहे असा कांगावा करणाऱ्यांपुढेही जोतिबा-सावित्रीबाईचं सहजीवन, त्यांनी जबाबदारीनं निभावलेलं व्यक्तिगत आणि सामाजिक पालकत्व हेही खणखणीतपणे ठेवणं महत्त्वाचं आहे. सावित्रीबाईंच्या जीवनाविषयी विचार करताना म. जोतिबांचा विचार वेगळा किंवा दूर काढताच येणार नाही. याचं कारण हेच की, जोतिबा स्वतः विचारवंत आणि समाजपरिवर्तनासाठी प्रयत्नशील होते आणि त्यांच्या या जीवनात सावित्रीबाई त्यांच्या सहचरी झाल्या होत्या. त्यामुळे सावित्रीबाईंचा विचार आणि कृती यांच्यामागे जोतिबांचा वैचारिक पाया होता हे निर्विवाद ! जोतिबांचं वैशिष्ट्य हे की, ते सामाजिक कामात समाजातील लोकांना घेऊन एकटेच काम करीत राहिले नाहीत. त्यांनी सावित्रीबाईंसह स्वतःच्या घरापासून, या कामांना सुरुवात केली; पत्नीला कामातही आपल्याबरोबर घेतलं.

विशेष म्हणजे, सावित्रीबाईही पतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत, त्यांच्या विचारात, कामात सहभागी झाल्या. महाराष्ट्रात अनेक विचारवंत आणि समाजसुधारक होऊन गेले. तरी याप्रकारे समाजाच्या विचारांचा ढाचाच बदलायला निघणारं जोतिबा-सावित्रीबाई हे बहुधा पहिलंच जोडपं असावं ! त्यातही सावित्रीबाईचा सहभाग केवळ 'मम' म्हणणारा किंवा शोभेचा नव्हता! विचार समजून घेत, प्रश्न विचारत, प्रत्रांना हात घालत स्वतंत्रपणेही त्या जोतिबांबरोबर वाट चालत होत्या. स्त्रीला माणसासारखं जगता यावं यासाठी तिला शिक्षणाची संधी हवी; हा विचार जोतिबांनी केला. त्यासाठी, आपल्या घरापलीकडच्या, घराघरातल्या स्त्रियांना जे सांगायचं, त्याची सुरुवात स्वतःच्या घरापासून व्हायला हवी, याची जाण असलेल्या जोतिबांनी प्रथम सावित्रीबाईंना साक्षर केलं, शिक्षिका म्हणून तयार केलं आणि स्त्री-शिक्षणाच्या कामात सहभागी करून घेतले. अंधारयुगातील सावित्रीबाईंसारखी एक दिव्यज्योत जगातील सर्व स्त्री समाजाला आपल्या प्रखर ज्योतीने दिव्य प्रकाश दाखवते, हे जरी आश्र्चर्य वाटण्यासारखे असले तरी, वास्तव सत्य असल्याने हे ऋण जगातील सर्व स्त्रीपुरुषांनी मानून या क्रांतिकार्यापुढे नतमस्तक होणे आणि कृतज्ञता व्यक्त करणे क्रमप्राप्त ठरते. जोतीरावांनी आपल्या दैदीप्यमान कार्याच्या ज्योतीने आपल्या सहधर्मचारिणी सावित्रीची ज्योत प्रज्वलित केली आणि हिंदुस्थानमध्ये स्त्रीसुध्दा अलौकिक व युगप्रवर्तक कार्य करू शकते, हे जगाला सिध्द करून दाखवले. सावित्रीबाई जोतीरावांच्या पत्नी म्हणून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्रांतिकार्यात सहभागी होणे स्वाभाविक होते. त्यात विशेष असे काय आहे; अशी शंका एखाद्याच्या मनात निर्माण होण्याची शक्यता आहे. परंतु एकोणिसाव्या शतकातील रावबाजी, पेशव्यांच्या काळातील स्त्री आणि शूद्र यांची पशुपेक्षाही हीनदीन असलेली परिस्थिती, भटभिक्षुकांनी देवाधर्माच्या नावाखाली स्वार्थासाठी घातलेला नंगानाच; यामुळे स्त्री आणि शूद्र ही माणसेच नाहीत अशी 'भूदेवां'ची ठाम समजूत होती. स्त्री म्हणजे नरकद्वार, स्त्री म्हणजे पापाचे माहेरघर, स्त्री म्हणजे पुरुषांच्या कामवासना त्याच्या इच्छेप्रमाणे भागविणारे एक साधन, एक दैनंदिन

: या पार्श्र्वभूमीवर सावित्रीबाईंच्या कार्याचे मूल्यमापन केल्यास त्यांचे कार्य म्हणजे भारतीय स्त्रियांच्या जीवनातील युगप्रवर्तक कार्य मानावे लागेल.जोतीरावांच्या सत्य, समता आणि मानवतावाद या तत्वांचा त्यांनी सर्व हयातभर पाठपुरावा करून स्त्री-मानवजातीसाठी आपले जीवनसर्वस्व अर्पण केले. भारतातील पहिली शिक्षिका, पहिली मुख्याध्यापिका व पहिली समाजसेविका सावित्रीबाईच होय. स्त्री-शूद्रांच्या सेवेतच खरी ईश्र्वरसेवा आहे, ही जोतीरावांकडून प्रेरणा घेऊन विरोधाला अगर छळाला न घाबरता आपले इच्छित कार्य त्यांनी यशस्वी करून दाखविले. स्त्री-शूद्रांचे व दीनदलितांचे दुःख पाहून त्या रडत बसल्या नाहीत. रडण्यापेक्षा ज्या संग्रामाची गरज होती, तो स्त्री-शूद्रांचा दुःखमुक्तीचा संग्राम जोतीरावांसारख्या क्रांतिवीराबरोबर मोठ्या जिद्दीने, धैर्याने, चिकाटीने, कौशल्याने त्यांनी यशस्वी केला. त्यांचा स्वभाव दयाळू, तितकाच स्वाभिमानी होता. त्या जशा रूपसंपन्न होत्या, तशाच गुणसंपन्न होत्या. स्त्री-शूद्रांबद्दल त्यांच्या मनात जेवढी अनुकंपा होती, तितकीच बालविवाह, बालविधवा, केशवपन, भ्रूणहत्या, सतीची चाल, तिरस्कृत विधवाजीवन या सर्व चालीबद्दल त्यांना मनापासून चीड होती. धर्माच्या नावाखाली भट-भिक्षुकांनी चालवलेली मानवतेची ही लूट त्यांना पाहवत नव्हती. देशामध्ये निम्मी संख्या स्त्रियांची असताना, त्या अज्ञानांधकारात व गुलामगिरीच्या नरकात हजारो वर्षे, पडून होत्या. जाणूनबुजून झाकण्याचाचे उच्च-नीच हे भेदाभेद कमी होण्याऐवजी ते वाढतच आहे स्त्रीसमाजाचेच आपण उदाहरण घेऊ. आज मूठभर स्त्रिया शिक्षण घेऊन, निरनिराळ्या क्षेत्रांत नोकरी करताना दिसतात, परंतु हे प्रमाण फारच अल्प असे आहे. यामध्ये ग्रामीण भागातील व शूद्र-अतिशूद्र समाजातील स्त्रियांची संख्या कार्यावरून भारतातील स्त्रीसमाज जागृत झाला किंवा मुक्त झाला असे मानता येणार नाही. खरे सांगावयाचे म्हणजे, स्त्रीमुक्तीबद्दल पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही म्हणावी तशी आस्था नाही. आपल्यापुरतेच मर्यादित वर्तुळ आखून सर्वसामान्य सुशिक्षित स्त्री आज जीवन जगत आहे. दीन आणि शूद्र-अतिशूद्र स्त्रियांवर आजसुध्दा दिवसाढवळ्या होणारे अत्याचार आजच्या सुशिक्षित स्त्रीला जरी दिसले तरी, त्याकडे डोळेझाक केल्याचा अनुभव येतो. अन्यायाविरूद्ध पेटून उठल्याची उदाहरणे क्वचित्च आढळतात. म्हणून सावित्रीबाईंच्या युगप्रवर्तक कार्यामधून प्रेरणा घेऊन देशातील शूद्र-अतिशूद्र, खेड्यापाड्यांतील दीन-दुबळ्या स्त्रियांचे ज्यावेळी पुरेसे शिक्षण होईल, ज्यावेळी त्या जागृत होतील, ज्यावेळी त्यांच्यामध्ये अस्मिता निर्माण होईल, ज्यावेळी त्या स्वावलंबी बनतील आणि आपण पुरूषांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाही इतका आत्मविश्र्वास त्यांच्यामध्ये निर्माण होईल; त्याचवेळी सावित्रीबाईंचे कार्य पूर्ण होईल.

साहित्याच्या बाबतीतही अशीच तफावत आढळते. बहुतेक सर्व लेखक, कवी, उच्च ब्राह्मणवर्गातील असून त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याचे विषयही त्यांच्याच पांढरपेशा जीवनावर आधारित असे असतात. यामध्ये काही अपवादही आहेत. परंतु सध्या एकूण साहित्य विचारात घेतल्यास शूद्र, अतिशूद्र व तळातील स्त्रीसमाज यांना या साहित्यात अद्याप पुरेसे स्थान नाही. विशिष्ट समाजातील व शहरातील सुखवस्तू लेखक व कवींना हे भानच दिसत नाही. 'कलेसाठी कला' या नावाखाली अशा पंडळीचे साहित्य आणि तळागाळातील समाजजीवन यांचा कुठे मेळच बसत नाही. स्त्रीशूद्रांच्या परिस्थितीचे, भावनांचे आणि आशा-आकांक्षांचे व्याकरण अद्याप या लेखक कवींना जमलेले नाही. अलीकडे शूद्र अतिशूद्र समाजातील काही नवोदित लेखक-कवी उदयास येत आहेत. पोटतिडकीने आणि त्वेषाने त्यांच्या भावना त्यांच्या साहित्यात उफाळत आहेत. परंतु ही संख्यासुद्धा अत्यल्पच आहे. माझ्या मते उद्याच्या साहित्यात तळागाळातल्या बहुसंख्या समाजाचे चित्र रेखाटले गेले नाही आणि त्यांच्या जीवनाशी ते एकरुप झाले नाही तर त्याला साहित्यसुद्धा म्हणता येणार नाही. यासाठी महात्मा जोतीराव फुल्यांचा सर्वसमावेशक असा मानवतावादी दृष्टिकोण साहित्यात आणून, लोकभाषेत साहित्य निर्माण होण्याची खरी गरज आहे. म्हणूनच भाषेच्या शुद्धलेखनापेक्षा, तिच्या सौंदर्य अलंकारांपेक्षा, स्त्री-शूद्रांचे जीवन हा केंद्रबिंदू मानून, जोतीराव आणि सावित्रीबाईंनी साहित्य जसे निर्माण केले, तीच प्रेरणा अनुसरण्याची गरज आहे.सन १८९७ साली महाराष्ट्रात प्लेगची मोठी साथ पसरलेली होती. प्लेगच्या रोग्यांना दवाखान्यात आणून उपचार करण्यासाठी सावित्रीबाई अहोरात्र प्रयत्न करत होत्या. त्यांचा मुलगा डॉ. यशवंतराव हाही प्लेगच्या रोग्यांवर सेवाभावाने उपचार करत होता. एका प्लेग झालेल्या महार मुलाला सावित्रीबाई आपल्या खांद्यावरून आपला मुलगा डॉक्टर यशवंत यांच्या दवाखान्यात आणताना त्यांनाही प्लेगचा प्रार्दुभाव झाला आणि त्यातच दि. १० मार्च १८९७ रोजी ही दिव्य ज्योत मालवली. एका सक्रीय जीवनाची अखेरही सक्रीयतेतच झाली...

**अरुण वाघ**
**मोबाईल क्रमांक ९२२३२०३५४५**

# ईव्हीएम यंत्र चाचणी प्रक्रियेस मनपा आयुक्ताची भेट

लातूर/प्रतिनिधी :मनपा निवडणूकीच्या अनुषंगाने प्रशासनाची तयारी सुरु आहे. त्यासाठी सुरु असणाऱ्या मतदान यंत्र प्रात्यक्षिकास मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी भेट दिली. निवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांना मतदान यंत्र हाताळनी व मार्गदर्शनासाठी ४२ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या उपस्थितीत यंत्राची चाचणी घेण्यात आली.महिला तंत्रनिकेतन येथे ही चाचणी घेण्यात आली.यावेळी आयुक्त श्रीमती मानसी यांनी सर्व मास्टर ट्रेनर, प्रक्रियेत सहभागी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.



निवडणुकी संदर्भात विविध विषयावर त्यांनी चर्चा केली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे,प्रवीण इंगळे, कसगवडे, परमेश्र्वर होके व कर्मचारी उपस्थित होते.

# निलंगा येथे तलाठ्याला २,५०० रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले

निलंगा / प्रतिनिधी :–उत्पन्नाचा दाखला देण्यासाठी लाच मागणाऱ्या ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून रंगेहाथ पकडले आहे. ही कारवाई निलंगा तालुक्यात करण्यात आली.

तक्रारदार (वय ३८, रा. सोनखेड, ता. निलंगा, जि. लातूर) यांनी दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी तोंडी तक्रार दाखल केली होती. तक्रारदार यांच्या आई विमलबाई मोहन सोळंके यांच्या नावाने श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना तसेच इतर शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेला उत्पन्नाचा दाखला देण्यासाठी तलाठी कमलाकर विठ्ठलराव मुंडे (वय ५२, सज्जा गुंजरगा, ता. निलंगा) यांनी सुरुवातीला ५,००० रुपयांची लाच मागितल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता.

लाच मागणीची पडताळणी १ जानेवारी २०२६ रोजी निलंगा येथील खाजगी तलाठी कार्यालयात करण्यात आली असता, संबंधित तलाठ्याने २,५०० रुपयांची लाच स्वीकारण्यास सहमती दर्शवल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्याच दिवशी दुपारी १.०५ वाजता सापळा कार्यवाही राबवण्यात आली. पंचासमक्ष आरोपीने तक्रारदाराकडून २,५०० रुपये स्वीकारताच त्याला रंगेहाथ पकडण्यात आले.

आरोपीच्या अंगझडतीत लाच रक्कम व मोबाईल हँडसेट मिळून आला आहे. मोबाईलची तपासणी सुरू असून गरज भासल्यास तो जप्त करण्यात येणार आहे. आरोपीच्या घरझडतीची कार्यवाहीही सुरू आहे.

या प्रकरणी निलंगा पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ अंतर्गत कलम ७ अन्वये गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई सापळा अधिकारी संतोष धनसिंग बर्गे, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून तपास विशाल बहात्तरे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग करत आहेत.

# विवेकानंद जडे यांना समाजभूषण पुरस्कार

सोलापूर/प्रतिनिधी : दैनिक लातूर समाचारचे संपादक विवेकानंद शंकरराव जडे यांना नुकताच सोलापूर येथे भव्य कार्यक्रमात राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सोलापूर येथे झालेल्या सोनार समाज संस्थेच्यावतीने झालेल्या कार्यक्रमात राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार मान्यवरांच्याहस्ते देण्यात आला. सन्मानचिन्ह, ज्ञानेश्र्वरी ग्रंथ, मानपत्र, शाल–फेट देऊन सत्कार करण्यात आला. सोनारसमाजील मान्यवरांची उपस्थितीत समाजातील कर्तृत्वान व्यक्तींना विविध पुरस्कारने सन्मानित यावेळी करण्यात आले.



संस्थेचे अध्यक्ष वसंतराव पोतदार यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करून कार्यक्रमागची भुमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार लक्ष्मीकांत वेदपाठक यांनी केले. या वेळी समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. विविध प्रश्र्नाची सोडवणुक समाज संस्थेच्यावतीने करीत आहे. वधु–वरांची माहिती. समाजातील आडचणी सोडविण्यात येत आहे. त्यामुळे अनेकांनी या संस्थेस धन्यवाद दिले आहेत.

# अर्चना गुंजाळ-शिंदे यांना पीएच. डी.

लातूर : येथील दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका अर्चना गुंजाळ–शिंदे यांना छत्रपती संभाजीनगरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने इंग्रजी विषयातील पीएच. डी. पदवी बहाल केली.



गुंजाळ–शिंदे यांनी बार्शी (जि. सोलापूर) येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अनिल कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली 'वुमन सबज्युगेशन ण्ड अमॅनसिपेशन इन द सिलेक्ट वर्क ऑफ बुची इमेचेटा: अ स्टडी' या विषयावर शोधप्रबंध विद्यापीठाला सादर केला होता. त्यानिमित्त त्यांना पीएच. डी. पदवी प्रदान केली. गुंजाळ–शिंदे यांच्या यशाबद्दल मार्गदर्शक डॉ. अनिल कट्टे, डॉ. पांडुरंग शितोळे, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. रमेश चौगुले, डॉ. समाधान पवार, निवृत्त प्राचार्य बाबासाहेब गुंजाळ, सतीश पवार, रणधीर निंबाळकर, ईश्र्वरप्रसाद बिदादा आदींनी अभिनंदन केले.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'विशाखा काव्य पुरस्कार - २०२५' साठी कवितासंग्रह पाठविण्याचे आवाहन

नाशिक (प्रतिनिधी) : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनामार्फत नवोदित कवींकडून सन २०२५ च्या विशाखा काव्य पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. यानुसार इच्छुक कवींनी सन २०२५ मध्ये प्रकाशित झालेला आपला पहिला मराठी काव्यसंग्रह येत्या ३१ जानेवारी २०२६ पर्यंत विद्यापीठात 'प्रमुख – कुसुमाग्रज अध्यासन' या पत्त्यावर केवळ टपालाद्वारे पाठवावा, असे आवाहन कुसुमाग्रज अध्यासनातर्फे करण्यात आले आहे.




यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या नावाने स्थापित अध्यासनामार्फत, त्यांच्या सुप्रसिद्ध 'विशाखा' या काव्यसंग्रहाच्या नावाने नवोदित कवींच्या मराठी भाषेतील प्रथम काव्यसंग्रहास दरवर्षी पुरस्कार दिला जातो. यंदा विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या पुरस्काराची नियमावली निश्र्चित करण्यात आली आहे. त्यानुसार १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेल्या काव्यसंग्रहांमधून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या पुरस्कारासाठी अर्ज करण्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. सादर करण्यात येणारा काव्यसंग्रह केवळ मराठी भाषेतील असावा व त्यावर प्रकाशन वर्ष ठळकपणे मुद्रित केलेले असणे आवश्यक आहे. तसेच, संबंधित काव्यसंग्रहाची यापूर्वी कोणतीही ई–आवृत्ती प्रकाशित झालेली नसावी. पुरस्कारासाठी कवी स्वतः किंवा संबंधित प्रकाशक अर्ज पाठवू शकतात.

अर्जासोबत काव्यसंग्रहाच्या पाच प्रती, कवीची पासपोर्ट आकाराची दोन छायाचित्रे, सविस्तर परिचयपत्र तसेच हा काव्यसंग्रह कवीचा प्रथमच प्रकाशित झालेला असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. प्रतिज्ञापत्र संलग्न नसल्यास संबंधित काव्यसंग्रह पुरस्कारासाठी विचारात घेतला जाणार नाही. प्रतिज्ञापत्राचा नमुना विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. परिचयपत्रामध्ये कवीचा संपूर्ण पत्ता, ई–मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद केलेला असावा.

काव्यसंग्रह केवळ टपालाद्वारेच पाठवावेत. खाजगी कुरीयर सेवेद्वारे पाठविलेले काव्यसंग्रह स्वीकारले जाणार नाहीत. पाकीटावर 'विशाखा काव्य पुरस्कारासाठी' असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. या पुरस्कारासंबंधी विद्यापीठ व निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

# माझं घर प्रकल्पात महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे शनिवारी अनावरण

लातूर–थोर समाजसुधारक, शिक्षणमहर्षी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण सोहळा माणूस प्रतिष्ठान संचालित माझं घर प्रकल्प, बुधोडा येथे आयोजित करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार (जाने ३) रोजी दुपारी ३ वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

बहुजन उद्धारक महात्मा जोतीराव फुले हे थोर समाजसुधारक व शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि अस्पृश्यता निवारणासाठी मोलाचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी व तरुणांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने माझं घर येथे महात्मा जोतीराव फुले यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्यात येत आहे. ३ जानेवारी हा सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस आहे. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या शिक्षिका व समाजसुधारिका होत्या. त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण प्रमुख मान्यवरांच्या उपस्थिती होणार आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्योतिर्मय सावित्री या पुस्तकाच्या लेखिका तथा साहित्यिक अरुणा दिवेगावकर राहणार असून पुतळ्याचे अनावरण महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमास प्रमोद (बाबा) झिंजाडे, (बार्शी), राजेंद्र कासार ( पुणे), संध्याताई बारगजे (बीड), हरिश्र्चंद्र सुडे (लातूर), अँड शोभाताई गोमारे, डॉ. निता मस्के–पाटील, डॉ. निलम पन्हाळे, प्रा. सुशिला पिंपळे–नारनावरे, मायाताई सोरटे, रंजना चव्हाण, रंजनाताई हासुरे आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजन समितीच्यावतीने शरद झरे, संगीता झरे, दगडूसाहेब पडिले, बालासाहेब यादव,.सतिष सोनकांबळे, पांडूरंग जाधव, सुनिल हेंगणे, गणपतराव पाटील, रफि पटेल, सय्यद रहेमान, प्रा. कपिल शेवाळे, प्रा. सुनिल गुरनाळे, प्रा. संतोष बडूरकर, लिंबराज बिरादार, पांडूरंग मोरे, बस्वराज अष्टुरे, विक्रांत शंके, श्रीनिवास बडूरे, संतोष साखरे, हरेश्र्वर करंडे यांनी केले आहे.

# अपघातातील मृत्यू रोखण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन आवश्यक-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर : प्रत्येक व्यक्तीचा जीव मौल्यवान असतो, मात्र वाहतूक नियमांचे पालन न केल्याने आपण आपला आणि इतरांचाही जीव धोक्यात टाकतो. देशात जवळपास एक ते दीड लाख व्यक्तींचा दरवर्षी अपघातात मृत्यू होतो, यामध्ये सुमारे दहा ते अकरा टक्के मृत्यू आपल्या राज्यात होतात. हे मृत्यू टाळण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज आहे. विशेषतः युवा वर्गाने यासाठी पुढाकार घ्यायला हवा, युवक–युवतींनी वाहतूक नियमांचे पालन करून इतरांनाही त्याबाबत जागरूक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले.




लातूर जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग व पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चे उद्घाटन जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांच्या हस्ते झाले. जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, राज्य रस्ते परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक अश्र्वजीत जानराव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रस्ते सुरक्षा विषयक माहितीपुस्तिका, भिंतीपत्रिका, जनजागृती फलकाचे प्रकाशन करण्यात आले.नववर्षाच्या पहिल्याच दिवसापासून राज्य रस्ता सुरक्षा अभियान सुरू होत आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने नववर्षानिमित्त वाहतूक नियमांच्या पालनाचा संकल्प करावा. आपला जीव हा सर्वात मौल्यवान आहे, वेगात वाहन चालवून आपला जीव धोक्यात घालू नका. केवळ दंड वाचविण्यासाठी नव्हे, तर स्वतःचा आणि इतरांचा जीव वाचविण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन करावे. वाहने सावकाश चालवा. रस्ता सुरक्षा ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. तसेच अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना मदत करण्याची संवेदनशीलता आवश्यक आहे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे म्हणाल्या.

रस्ता सुरक्षा का आवश्यक आहे, याची जाणीव प्रत्येकाला असणे गरजेचे आहे. अपघातामध्ये मृत्यू होणे दुर्दैवी बाब असून, मृत्यूमुळे होणारी हानी भरून न निघणारी आहे. अपघात रोखण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करावे. दुचाकी चालवताना हेल्मेट आणि चारचाकी वाहन चालवताना सीट बेल्टचा वापर करणे आवश्यक आहे. अपघातात होणारे बहुतांशी मृत्यू हे हेल्मेट, सीट बेल्ट न वापरल्यामुळे होतात, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले.

रस्ता सुरक्षा अभियान हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे, रस्ते अपघातातील मृत्युदर हा एखाद्या महामारीमुळे होणाऱ्या मृत्यूपेक्षा अधिक आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्वांनी वाहतुक नियमांचे पालन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी केले. तसेच पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहने चालविण्यास देवू नयेत. त्यामुळे अपघात झाल्यास त्याची जबाबदारी पालकांवर येते, असे ते म्हणाले.

प्रास्ताविक मोटार वाहन निरीक्षक अभिजीत रेळे यांनी केले. यावेळी त्यांनी रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी अपघातग्रस्तांना मदत करणारे दयाराम जगन्नाथ सुडे, गणेश गिराम, आबासाहेब शिंदे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर आता 'रडार'ची नजर–वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना ई–चलनद्वारे दंड आकारण्याची कार्यवाही वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागामार्फत केली जात होती. मात्र, आता परिवहन विभागाच्या ताफ्यात आता २ नवीन 'रडार' वाहने दाखल झाली आहेत. यामुळे महामार्गांवर, रहदारीच्या ठिकाणी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर कॅमेरा, सेन्सरद्वारे लक्ष ठेवता येणार आहे. तत्याने अपघात होत असलेल्या ठिकाणी पहिल्या टप्प्यात हे वाहन तैनात केले जाणार आहे. तसेच वाहतूक कोंडी निर्माण होणाऱ्या ठिकाणी ही वाहने तैनात केली जातील. वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनावर ई–चलनद्वारे दंड आकारण्याची कार्यवाही या वाहनाद्वारे केली जाणार आहे. या वाहनांना आज जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखविण्यात आली.

# सेवानिवृत्तीनंतरही कर्मचाऱ्यांचे नाते आपुलकी आणि स्नेहाचे राहणार–बसवराज पाटील

(मुरुम प्रतिनिधी)–कै. माधवराव (काका) पाटील ज्या उद्देशाने शैक्षणिक संस्थेची उभारणी केली. त्यांचे स्वप्न होते की, संस्थेत चांगली माणसे आली पाहिजेत. त्यामुळे नगर शिक्षण विकास मंडळ या संस्थेत जे कर्मचारी नियुक्त केले गेले ते गुणवत्ताधारक होते आणि आहेत. चांगली माणसे निर्माण होणे ही संस्थेची परंपरा असून ज्या कर्मचाऱ्यांनी संस्थेत राहून मिळालेल्या संधीचे सोने केले. त्यामुळेच संस्थेचे शैक्षणिक क्षेत्रात नाव होत आहे. संस्था म्हणजे एक परिवार असून प्रत्येक कर्मचारी हा संस्था व पाटील परिवाराशी एकरुप असून आमचे नाते अतूट बनले आहे. सेवानिवृत्तीनंतरही कर्मचाऱ्यांचे नाते आपुलकी आणि स्नेहाचे राहणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री तथा भाजप लातूर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष बसवराज पाटील यांनी प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ. अशोक सपाटे व प्रा. डॉ. नागनाथ बनसोडे यांचा गुरुवारी (ता. १) रोजी नगर शिक्षण विकास मंडळ, मुरूम च्या वतीने माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात संस्थेच्या वतीने सेवापुर्ती सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बसवराज पाटील व बापूराव पाटील यांच्या हस्ते सपाटे व बनसोडे यांचा संपूर्ण आहेर उपचार करून सपत्नीक सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बसवराज पाटील होते. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दिलीप भालेराव, संस्थेचे संचालक राजू भोसगे, प्राचार्य डॉ. सादक वली, प्राचार्य उल्हास घुरघुरे, माजी प्राचार्य सच्चिदानंद अंबर, दत्तप्रसाद शेळके, कांत हुलसुरे, काशिनाथ मिरगाळे, बाबुराव जाधव, देवेंद्र कंटेकुरे, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, सौ. उषा सपाटे, प्रा. डॉ. नागनाथ बनसोडे, सौ. वैशाली बनसोडे, मुख्याध्यापक इरफान मुजावर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कै. माधवराव (काका) पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.




अध्यक्षीय समारोपप्रसंगी बसवराज पाटील म्हणाले की, या संस्थेत प्राध्यापक ते प्राचार्य म्हणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र कार्य केल्यानेच आज त्यांचे विद्यार्थी विविध क्षेत्रांमध्ये नावारुपाला येत आहेत.

सत्काराला उत्तर देताना सपाटे म्हणाले की, जे अनुभव मला या संस्थेत काम करताना आले त्यांचा लेखाजोखा मांडून सर्वांप्रती कृतज्ञताभाव व्यक्त करून सर्व उपस्थितांचे आभार मानले. डॉ. बनसोडे म्हणाले की, संस्थेच्या प्रती आम्ही कायम ऋणात राहून पुढच्या काळात देखील संस्थेशी एकरूप राहू. यावेळी प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील प्राध्यापक-प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. अशोक बावगे यांनी मानले. विविध शाळेतील मुख्याध्यापक, सहशिक्षक, सहकारी मित्र, नातेवाईक, मुरूम शहरातील पदाधिकारी-कार्यकर्ते आदींनी त्यांचा यथोचित सत्कार केला.

फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात संस्थेच्या वतीने आयोजित अशोक सपाटे, नागनाथ बनसोडे यांच्या सेवापुर्ती सोहळ्याच्या प्रसंगी बसवराज पाटील बोलताना बापूराव पाटील, दिलीप भालेराव, अशोक सपाटे, नागनाथ बनसोडे आदी.

# रेणापूरच्या लोकनियुक्त भाजपाच्या नगराध्यक्षा शोभा शामराव अकनगिरे यांनी स्वीकारला पदभार शहराचा सर्वांगीण विकास हेच ध्येय – अभिषेक आकनगिरे

लातूर – तब्बल गेली तीन वर्षे प्रशासकांच्या ताब्यात असलेल्या रेणापूर नगरपंचायतीच्या लोकनियुक्त भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्षा शोभाताई शामराव अकनगिरे यांनी आज गुरुवारी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात रेणापूर शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असे प्रथम नगराध्यक्ष तथा नगरसेवक अभिषेक आकनगिरे यांनी बोलून दाखविले.




रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी गेल्या २० डिसेंबर रोजी पार पडलेल्या निवडणुकीत लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वातील भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष उमेदवारासह दहा नगरसेवक बहुमताने विजयी होऊन रेणापूर नगरपंचायतीवर पुन्हा एकदा भाजपाचा झेंडा फडकला. नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष शोभा शामराव आकनगिरे यांचा पदग्रहण सोहळा गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी संपन्न झाला. मोठ्या उत्साहाच्या वातावरणात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यावेळी रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी रोहित आरबोळे, अहमदपूरचे प्रतीक लंबे, प्रशासकीय अधिकारी प्रदीप पाटील, ज्योती वलांडे, अंकुश फड, अमोल बाजुळगे, महमूद शेख या अधिकारी कर्मचाऱ्यासह नवनिर्वाचित नगरसेवक अभिषेक आकनगिरे, सुमन मोटेगावकर, सुनिता बसतापुरे, दत्ता सरवदे, धरती गाडे, रबियाबी शेख, हुसेना शेख, खैरोनिसा आत्तार, ज्योती चव्हाण, वाहेद शेख, प्रदीप राठोड त्याचबरोबर अधिकारी, भाजपचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यानंतर अनेकांनी शोभाताई आकनगिरे यांचे पुष्पगुच्छ देऊन पेढा भरून अभिनंदन केले.

यावेळी नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने नगराध्यक्षा शोभा आकनगिरे यांच्यासह सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक अभिषेक आकनगिरे म्हणाले की, गेल्या तीन वर्षात प्रशासकीय कार्यकाळात नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. केंद्र आणि राज्यातील भाजपा शासनाच्या माध्यमातून आ. रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी आणू. येणारी पाच वर्षे ही जनतेची असतील, नागरी सुविधासह रेणापूर शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरपंचायतीचे ज्ञानदेव दहिफळे यांनी केले. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन दोघे मिळून निश्चितपणे रेणापूरच्या विकासाला गती देण्याचे काम करू अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी भाजपाचे बापूसाहेब कुलकर्णी, अच्युत कातळे, श्रीनिवास अकनगिरे, चंद्रकांत कातळे, दिलीप आकनगिरे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, उज्वल कांबळे, दिलीप राजे, राजकुमार आलापुरे, महेश काळे, हनुमंत भालेराव, उमेश सोमाणी, धनराज बरुरे, बंडू एचवाड, प्रभाकर बोरुडे, सुरेश भंडारे, उत्तम चव्हाण, दिलीप चव्हाण, गणेश चव्हाण, सुभाष राठोड, शेख अजीम, नरसिंग येलगटे, शिवाजी भावे, अंगद काळे, संजय वीरुळे, राजकुमार आकनगिरे, शेख शहंशाह, साधू लोकरे, खुद्दुस शेख, अंकित हाके, शंकर चक्रे, नंदकुमार बंडे, जगन्नाथ कातळे, सलीम शेख, शरद चक्रे, अंकुश मोटेगावकर, योगेश राठोड, कुमार आकनगिरे, धम्मानंद घोडके, ज्ञानेश्वर शिंदे, निलेश हुलगुंडे, मुनाफ शेख, सुरेश खोबरे, मनोज चक्रे, साताप्पा खोबरे, फारूक कुरेशी यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी लोकप्रतिनिधी रेणापूर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूरात दृष्टी दिव्यांग व्यक्तींसाठी ब्रेल महोत्सव २०२६चे आयोजन

लातूर –बियांड व्हिजन फाउंडेशन, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर शाखा, अंधजन विकास मंडळ, लातूर यांच्यावतीने दि. ०४ जानेवारी विश्र्व ब्रेल दिनाचे औचित्य साधून दि. ०२ ते ०४ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये बालाजी मंदिर, मंगल कार्यालय, पाप विनाश रोड, लातूर येथे दृष्टी दिव्यांगांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी ब्रेल महोत्सव २०२६चे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात राज्यातील विविध जिल्ह्यातून दोनशेहून अधिक दृष्टी दिव्यांग व्यक्ती सहभागी होणार आहेत.या महोत्सवात दि. ०२ जानेवारी २०२६ रोजी राज्यस्तरीय ऑनलाईन ब्रेल वाचन स्पर्धेचे आयोजन केले आहे.दि. ०३/०१/२०२६ रोजी कनिष्ठ व वरिष्ठ अशा दोन गटात राज्यस्तरीय सुगम संगीत स्पर्धे चे आयोजन केले आहे.या स्पर्धे चा उद्घाटन समारंभ स. १० वाजता श्रीमती तृप्तीताई अंधारे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद लातूर, डॉ. विजयभाऊ राठी, अध्यक्ष, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर शाखा तथा माजी प्रांतपाल रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२, डॉ. संजय गवई, प्रोफेसर, समाजकार्य विभाग, महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. त्यानंतर दिवसभर सुगम गायन स्पर्धा सुरू राहणार आहे.

या स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह, रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले जाणार आहे.दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी ०८ ते १० या वेळेत राज्यातील दृष्टी दिव्यांग व्यक्तींद्वारे प्रदर्शित विविध कला गुण दर्शविणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला जाणार आहे.

दि.०४ जानेवारी २०२६ रोजी स. ११ वा. लुई ब्रेल यांच्या प्रतिमेस अभिवादन, राज्यस्तरीय ऑनलाइन ब्रेल वाचन व सुगम गायन स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पुरस्कार वितरण व शासकीय अंधशाळा, लातूर येथील माजी विद्यार्थी श्री. दिनेश गोपीनाथ महाजन यांनी आपल्या दृष्टीबाधितेसह जीवन जगताना आलेले अनुभव प्रकट करणाऱ्या वाटेवरल्या पाऊल खुणा या आत्मचरित्राचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे.

या समारोप व बक्षीस वितरण समारंभास प्रमुख अतिथी म्हणून अर्चनाताई पाटील चाकूरकर, ज्येष्ठ भाजपा नेत्या तथा सामाजिक कार्यकर्त्या, लातूर, श्रीमती सोनाली मुकुंद औंधकर, न्यायाधीश, लेबर कोर्ट, लातूर., श्री. अविनाश देवसटवार, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, लातूर विभाग लातूर, डॉ. विजयभाऊ राठी, अध्यक्ष नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर, श्री. सुधीर लातूरे, प्रांतपाल, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२, श्री. हरीप्रसाद सोमानी, माजी प्रांतपाल, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२, श्री. सुधाकर बळवंत जोशी, संचालक, जोशी मॅथ क्लासेस, लातूर, श्री. सुधाकरराव घारापुरकर, उपाध्यक्ष, अंधजन विकास मंडळ, श्री. रघुनाथ बारड, अध्यक्ष, राष्ट्रीय दृष्टीहीन संघ, महाराष्ट्र राज्य, मुंबई, डॉ. संजय गवई, प्रोफेसर, समाजकार्य विभाग, महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूर यांची उपस्थिती लाभणार आहे.

या महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील दृष्टी दिव्यांगांनी सहभागी होऊन आपल्या कलागुणांना विकसित करण्याचे आवाहन डॉ. माधव गोरे (अध्यक्ष), बियांड व्हिजन फाउंडेशन (९४२३३४५०४५) आणि प्रल्हाद बुडले, सचिव, अंधजन विकास मंडळ, लातूर यांनी केले आहे.

# नवी मुंबई महापालिका निवडणूक : वंचित बहुजन आघाडीच्या १८ उमेदवारांची यादी जाहीर

नवी मुंबई / के. एच. हनवते :- आगामी नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. पक्षाने नवी मुंबईतील विविध प्रभागांमधून एकूण १८ उमेदवारांना निवडणूक रिंगणात उतरवले असून, वंचित बहुजन समाजातील प्रतिनिधित्व, सामाजिक समता आणि स्थानिक प्रश्र्नांना प्राधान्य देत उमेदवारांची निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

जाहीर करण्यात आलेल्या यादीत नमिता राजेश भालेराव प्रभाग क्र. १ (अ), भूषण लक्ष्मण कासारे प्रभाग क्र. ३ (अ), माया गौतम मनवर प्रभाग क्र. ३ (क ), सुवर्णमाला बाळू डोळस प्रभाग क्र. ४ (अ ), विश्र्वास चंद्रकांत गांगुर्डे प्रभाग क्र. ४ (ड ), अजय राम गायकवाड प्रभाग क्र. ६ (अ ), जनार्दन दामोदर थोरात प्रभाग ७ (अ ), संजय अंकुश गायकवाड प्रभाग क्र. १० (ड ), सुरज दशरथ वाकळे प्रभाग क्र. १४ (क ), रामदास शामराव सोनवणे प्रभाग क्र. १४ (ड ), सारिका सुनील भोले प्रभाग २० (अ ), दिनेश सुभाषचंद्र पुटगे प्रभाग क्र. २० (ड ), भारती मानसिंग जाधव प्रभाग क्र. २२ ( ड ), कल्याण हरिभाऊ हणवते प्रभाग क्र. २३ (क ), माजिद अनवर इब्जी प्रभाग क्र. २५ (ड ), पूजा उमेश हातेकर प्रभाग क्र. २६ (ब /क ), उमेश हरिदास हातेकर प्रभाग क्र. २६ (ड ), राहुल शंकर शिरसाट प्रभाग क्र. २८ (क ) यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेत सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्र्न, पाणी, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता आणि गृहनिर्माण यांसारख्या मुद्द्यांवर ठोस भूमिका मांडण्यासाठी वंचित बहुजन आघाडी सक्षमपणे निवडणूक लढवणार आहे. असी माहीती वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : अश्र्वजीत जगताप, नवी मुंबई (महिला जिल्हाध्यक्ष) शिल्पाताई रणदिवे, तसेच नवी मुंबई महासचिव : सुनील भोले, आणि नवी मुंबई जिल्हा कार्यालयीन : महासचिव मल्लिनाथ सोनकांबळे यांनी दिली. लढेंगे... जितेंगे...!

# रो. विश्र्वनाथ स्वामी (सावळे) यांच्यातर्फे रोटरी आधार रुग्ण सेवा केंद्राला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट

लातूर-लातूर शहरातील रुग्णांच्या विविध गरजा पुरविण्यासाठी रोटरी आधार रुग्ण सेवा केंद्राची निर्मिती नुकतीच करण्यात आली आहे. या केंद्राद्वारे रुग्ण, नातेवाईक आणि कुटुंबीयांना उपचारानंतरच्या आरोग्य विषयक वस्तू व साधने मोफत आणि अल्प दरामध्ये उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच आरोग्य सेवा सुद्धा रुग्णांना पुरविण्यात येते. आधार रुग्ण सेवा केंद्रामध्ये सर्व पदाधिकारी हे रोटरी क्लबचे सर्व सदस्य आहेत. अशा या अत्यंत महत्त्वपूर्ण केंद्राला नुकतेच रो. विश्र्वनाथ स्वामी (सावळे) यांनी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर डोनेट केले आहे. यावेळी कॉपच्या अध्यक्ष डॉ. मायाताई कुलकर्णी आणि सचिव तथा रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचे अध्यक्ष रो. डॉ. गुणवंत बिरादार, रो. माधव पांडे आणि रो. विश्र्वनाथ स्वामी (सावळे) यांचे कुटुंबीय यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी रो. विश्र्वनाथ स्वामी (सावळे) यांनी रोटरी आधार रुग्णसेवा केंद्राला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरची भेट देऊन भविष्यातही आवश्यक असणाऱ्या बाबी डोनेट करण्याचे आश्र्वासन त्यांनी यावेळी दिले.यावेळी डॉ. मायाताई कुलकर्णी यांनी आणि रो. डॉ. गुणवंत बिरादार यांनी रो. विश्र्वनाथ स्वामी (सावळे) यांचे अभिनंदन करून त्यांनी दिलेल्या डोनेशन बद्दल समाधान व्यक्त केले तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनी या केंद्राला अर्थसहाय करावे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.



# 'राजमाता जिजामाता'तर्फे मतदान जनजागृती

लातूर- महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या मतदान जनजागृती उपक्रमाला राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. 'माझ्या उज्ज्वल भविष्यासाठी व लोकशाही मजबूत करण्यासाठी मी आई-बाबाला मतदान करण्यास प्रवृत्त करणार', असा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. यावेळी शिक्षक व कर्मचार्यांनी मतदानाची शपथ घेतली.



लातूर महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर 'स्वीप' मोहीम राबविण्यात येत आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून येथील राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी विशेष मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या मार्गदर्शनात आणि प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थिनींनी रांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती केली. यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, राजीव मुंढे, संजय गुरमे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड आर. पी मुंडे आदी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर – ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर – ४१३५१२ येथे प्रकाशित केले.